ePaper

## “नरेंद्र मोदींचा अहंकार भाजपाला संपवणार”, नाना पटोलेंचं भाजपावर टीकास्त्र



| वर्ष - 6 । अंक - 139 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शुक्रवार।दिनांक 26 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- खड्डयांना पेव्हर ब्लॉकची ‘ठिगळं’!
- संकल्प ; पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा !
- केवळ भावनिक राजकारणाचा भाग



बीबीडी चाळीत राहणाऱ्या पोलिसांना १५ लाखांत ५०० चौरस फुटांचे मालकीचे घर अन्यत्र पोलिसांना घरे. उल्हासनगरातील ३१ डिसेंबर २०२१ पर्यंतची अनधिकृत बांधकामे प्रतिचौरस मीटर २२०० रुपये याप्रमाणे दंड आकारणी करून नियमित करणार. कोकण रेल्वेसाठी राज्य पोलिसांचा स्वतंत्र विभाग, रखडलेले पुनर्वसन प्रकल्प गतिमान करण्यासाठी धोरण.कारशेड कायदेशीर कचाट्यात सापडून झालीच नसती त्यामुळे कारशेड आरेत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून आता तेथे एकही झाड तोडावे लागणार नाही. -एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री



आमच्या काळात केलेले २५ टक्के काम पुढे सुरु करुन प्रकल्प सुरु करायला हवा होता. पण ४०० कोटी रुपये खर्चाची कारशेड रखडली आणि सुमारे २० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पापुढे अडचणी आल्या. ही कारशेडची जागा १९५० पर्यंत पुरेशी आहे. आता आम्ही मेट्रो व मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प वेगाने मार्गी लावू. बदल्यांमधील भ्रष्टाचाराचा छडा लावण्यासाठी गुप्तवार्ता विभागाच्या प्रमुखांनी परवानगी घेऊन दूरध्वनी संभाषण ध्वनिमुद्रित करुन अहवाल दिला. -देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

# अतिरिक्त आयुक्तांचा आक्षेपार्ह ‘विकास’!

## भाजपाचे तुषार हिंगे यांची मागणी : विकास ढाकणे यांच्या कारभाराची चौकशी करा


पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी आपल्या कार्यकाळात मोठे निर्णय घेतले असून, अर्थकारण दडल्याचा संशय आहे. त्यामुळे त्यांच्या काळात झालेल्या निर्णयांची सखोल चौकशी करावी. तसेच, त्यांना राज्य शासनाच्या सेवेत परत घ्यावी, अशी थेट मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी ढाकणे यांच्या आक्षेपार्ह निर्णयाची यादीच राज्य सरकारकडे पाठवली असून, ढाकणे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**



तुषार हिंगे यांनी पत्रात म्हटले आहे की, भारतीय रेल्वे सुरक्षा सेवेतील (आयआरपीएफएस) विकास ढाकणे यांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्तपदी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारमार्फत झाली. राज्य सरकारने पती-पत्नी एकत्रीकरणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणाचा प्रतिनियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही, असे एका आदेशाद्वारे ३ ऑगस्ट २०२१ रोजी स्पष्ट केले आहे. त्यामुळे विकास ढाकणे यांची नियुक्ती नियमबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहे.

असे असतानाही, तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्या गळ्यातील विकास ढाकणे ताईत बनले होते. त्यांच्याकडे महानगरपालिकेतील बहुसंख्य महत्वाचे विभाग देण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यशैलीबाबत विविध आक्षेप वारंवार घेतले जातात. त्यांच्याकडे कायम ठेकेदारांची गर्दी असते. विकास ढाकणे हे मा. तत्कालीन श्री. आयुक्त राजेश पाटील यांचे बहुतांश काम करत होते. अनेक फाईलवर स्वाक्षरी आयुक्तांकडून होत असल्या तरी संपूर्ण कारभार ढाकणे यांच्या मर्जीनुसार चालू असल्याची चर्चा आहे. अनेक कामांना बिनशर्त मुदतवाढी दिल्या जात आहेत.निविदाप्रक्रियेत त्यांचा हस्तक्षेप दिसतो आहे असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विकास ढाकणे यांच्या कारभाराची कुसून चौकशी करावी आणि त्यांना शासन सेवेत परत घ्यावे, अशी मागणी तुषार हिंगे यांनी केली आहे.



### पदोन्नत्या देताना मोठे अर्थकारण झाल्याची शक्यता

मनपा प्रशासनामार्फत होणा-या बदल्या किंवा पदोन्नती वा संदर्भात संपूर्ण निर्णय आयुक्त घेत असल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे हे अधिकार वापरतात. अलीकडे झालेल्या बहुतांशी बदल्या व पदोन्नतीची परिपत्रके त्यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाले आहेत. अभियांत्रिकी विभागाकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक व सर्व्हेअर यांच्या पदोन्नत्या झाल्या.अलिकडेच एका सर्व्हेअर तीन लाख रुपये लाच मागितल्याच्या तक्रारीवरून एसीबीने केली. हे पाहता या पदोन्नत्या देताना मोठे अर्थकारण झाल्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांचा हस्तक्षेप...

महानगरपालिकेतील कारभार सध्या प्रशासक म्हणून संपूर्णपणे आयुक्तांच्या अधिकार कक्षेत चाललेला आहे. परंतु, तत्कालीन आघाडी सरकारच्या माध्यमातून नियुक्त झालेले अधिकारी हे सरकारच्या ईशाऱ्यावर व तत्कालीन आघाडी सरकारमधील स्थानिक राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांच्या म्हणण्याप्रमाणे कामकाज करीत आहेत. यावरून विकास ढाकणे यांची कार्यप्रणाली बघता ज्या प्रमाणे मुंबई पोलिस दलात शंभर कोटी वसुलीचे व प्रकरण समोर आले. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत वसुलीचा काही ‘ढाकणे पॅटर्न’ चाललेला आहे काय? अशी चर्चा आहे.

### तुषार हिंगे यांचे असे आहेत आक्षेप...

पवना, मुळा व इंद्रायणी नदीतील जलपणी काढण्याच्या कामासाठी सातत्याने मुदतवाढ देतसंबंधित कंत्राटदार यांना थेट काम दिले गेले. कोटींच्या खर्चाची हा कामे थेट झाल्याने प्रशासनावर अनेक आरोप झाले होते. मनपा शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या 40 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना अतिरिक्त आयुक्त यांच्या दप्तर दिरंगाईमुळे साहित्य मिळू शकले नाही.वैद्यकीय विभाग व रुग्णालयांसाठी विविध उपकरणे खरेदी आणि कामांमध्ये अनागोंदी कारभार सुरु आहे. अतिरिक्त आयुक्त यांच्या कक्षासाठी लाखो रुपयांच्या खुर्चा, सोफे खरेदी सुरू होती. त्यास विरोध झाल्यानंतर त्यांनी ही खरेदी खुद केल्याचे समजले आहे. अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या विभागामार्फत अनेक कामांना मुदतवाढ दिली जाते. निविदा प्रक्रिया न राबविता मुदतवाढ देऊन करदात्यांचे नुकसान व कंत्राटदारांचा फायदा करून देत असल्याचे दिसते.

# खड्डयांना पेव्हर ब्लॉकची 'ठिगळं'!

## महापालिका प्रशासनाचा प्रताप : पोलीस आयुक्तांसमोर वाहतूक शाखेची कैफियत

**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पावसाच्या संततधारेमुळे पिंपरी - चिंचवड शहर आजमितीस खड्डेमय झाले आहे. खड्डयांमुळे वाहतुकीचा वेग संथ होऊन ठिकठिकाणी कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतूक पोलिस शाखेकडून रस्त्यावर खड्डे बुजविण्यासंदर्भात महापालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. महापालिकेनेही काही ठिकाणी पेव्हर ब्लॉक टाकून रस्त्यांना ठिगळ लावण्याचे काम केले. त्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागतो आहे.**



गेल्या दीड महिन्यांपासून पिंपरी - चिंचवडमध्ये पावसाची संततधार सुरू आहे. या सततच्या पावसामुळे शहरातील रस्त्यांवर खड्डयांची चाळण निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होते आहे. या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत असताना, वाहतूक पोलिसांच्याही कोंडी सोडविताना नाकीनऊ येत आहे.

यासंदर्भात पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीमध्ये वाहतूक पोलिस शाखेने रस्त्यांवरील खड्डयांमुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याच्या तक्रारी केल्या. त्यामुळे वाहतूक शाखेकडून महापालिकेकडे रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार पत्रही देण्यात आले होते.



### समस्या निकालात निघालीच नाही...

दरम्यान, महापालिकेकडून शहरातील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले. परंतु, बहुतांश ठिकाणी पादचारी वा इमारतीच्या पार्किंगसाठी वापरण्यात येणारे पेव्हर ब्लॉक टाकून खड्डे बुजविण्यात येत आहेत. प्रत्यक्षात यामुळे रस्त्यावरील सारेच खड्डे बुजविले जात नसल्याने वाहनचालकांसाठी जी समस्या आहे, ती जैसे थेच राहिल्याने चालकांचा मनस्ताप काही कमी झालेला नाही. अनेक चौकांमध्ये, सिग्नल्सच्या ठिकाणी खड्डे आहेत तसेच आहेत. त्यामुळे वाहतुकीची गती वाढलेली नाही. उलट या खड्डयांमुळे लहानसहान अपघाताच्या घटनाही घडत आहेत. यातून गंभीर स्वरूपाची घटना घडण्याचीही शक्यता आहे, असेही बैठकीत सांगण्यात आले.

---

# महापालिका आयुक्तांकडून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## शेखर सिंह यांचा आदर्श : प्लास्टिक'मध्ये लपटलेला पुष्पगुच्छ नाकारला!

**पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्थेकडून देण्यात आलेला प्लास्टिकमध्ये लपटलेला पुष्पगुच्छ पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी नम्रपणे नाकारला. पुष्पगुच्छामधील एक गुलाबाचे फुल स्वीकारत आयुक्तांनी पर्यावरणाच्या रक्षणाचा संदेश दिला.



31 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर या कालावधीत साजरा होणारा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा व्हावा. याकरिता पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्थांची आज (गुरुवारी) महापालिकेत बैठक आयोजित केली होती. आयुक्तांसह संस्थांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

एका संस्थेने आयुक्तांच्या सन्मानासाठी प्लास्टिकचा पुष्पगुच्छ आणला. पण, तो गुच्छ आयुक्तांनी स्वीकारला नाही. गुच्छ नको अशी भूमिका आयुक्तांनी घेतली. संस्थेचा मान ठेवण्यासाठी पुष्पगुच्छामधील एक फुल आयुक्तांनी स्वीकारले. पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्थांनी प्लास्टिक टाळले पाहिजे असे सूचक संदेश आयुक्त सिंह यांनी गुच्छ नाकारुन दिला. पर्यावरणासाठी काम करणाऱ्या प्रतिनिधींची पर्यावरणपूरक कृती असावी. पर्यावरण पुरक काम करणाऱ्यांनी असे काम करु नये, असे आवाहनही आयुक्तांनी केले.

# संकल्प ; पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा !

## आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन : महापालिका प्रशासनाची जय्यत तयारी

पिंपरी। ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



सन २०२२ चा गणेशोत्सव आदर्श आणि पर्यावरणीय दृष्टीकोनातून व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी शहरातील सार्वजनिक मंडळे व नागरिकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

या मार्गदर्शक सुचनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका किंवा स्थानिक प्रशासन यांची त्यांच्या धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. नागरिकांनी गणेश उत्सवासाठी शाडूमातीच्या, तुरटीच्या किंवा कागदी लगद्यापासून बनविलेल्या पर्यावरणपूरक (विघटनशील) मूर्तींना प्राधान्य द्यावे किंवा धातु, लाकूड, दगड यापासून बनविलेल्या पुनर्वापर करता येणाऱ्या मूर्ती वापराव्यात.

मूर्तीसाठी विषारी व अविघटनशील रासायनिक रंग वापरण्यास सक्त मनाई आहे. मुर्ती शाडूची किंवा पर्यावरणपूरक असल्याने त्याचे विसर्जन घरच्या घरी करावे. गर्दी टाळण्यासाठी विसर्जनासाठी यावर्षी कृत्रिम विसर्जन हौद उपलब्ध करुन देण्यात येतील. नागरिकांनी घरीच किंवा परिसरात गणेश मूर्तींचे विसर्जन करावे, जेणेकरुन आगमन आणि विसर्जनासाठी गर्दी टाळणे शक्य होईल. उत्सवाकरिता वर्गणी किंवा देणगी स्वेच्छेने दिल्यासच मंडळाने त्याचा स्वीकार करावा. जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.

> संपूर्ण गणेशोत्सवात शांतता राखणेकामी व महोत्सव सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी महापालिका कर्मचारी, होमगार्ड, आरोग्यसेवक, पोलिस यांना सहकार्य करावे. सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्यांच्या वापरावर महाराष्ट्र शासनाचे अधिनियमानुसार बंदी करण्यात आलेली आहे त्यामुळे उत्सवाच्या काळात तसेच विसर्जनाच्या वेळी नदी पात्रात / तलावात / निर्माल्य कलशात प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर करु नये. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर केलेला आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
> - शेखर सिंह, आयुक्त व प्रशासक, पिंपरी-चिंचवड.

यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच मंडळांनी आरोग्य विषयक उपक्रम किंवा शिबीरे रक्तदान शिबीर इत्यादी आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, चिकनगुनिया, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी. आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना ध्वनी प्रदुषणा संदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे. अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी मंडळांनी श्रीगणेशाचे आरती व दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीव्दारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी. गणपती मंडपामध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. श्रींच्या च्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढताना संपूर्ण चाळीतील किंवा इमारतीतील सर्व घरगूती गणेशमूर्तींच्या विसर्जनाची सोय त्याच परिसरात करावी.

### प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती नको...

महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वंयसेवी संस्था इत्यादीच्या मदतीने एक भाग किंवा वॉर्ड एकच गणपती ही संकल्पना राबविणे बाबत पुढाकार घ्यावा व शक्यतो लहान आकाराची पर्यावरणपूरक गणपतीची स्थापना करावी व त्याच ठिकाणी विसर्जनाची सोय करावी. शक्यतो प्लास्टर ऑफ पॅरीस [POP] च्या मूर्ती वापरु नये. अशा मूर्ती तयार करणाऱ्यांनी मूर्तीच्या खाली सदरची मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरीसची, असल्याबाबत लाल मार्किंग करावी. जेणेकरून सामान्य नागरिकांना मूर्ती ओळखणे सुलभ होईल. घरगूती मूर्त्यांची आरास करण्यासाठी तसेच देखाव्यासाठी प्लॅस्टिक, थर्माकोल व इतर पर्यावरणास हानीकारक वस्तूंचा वापर करु नये व नैसर्गिक अशा विविधरंगी फुलांच्या आरासीन अधिकाधिक प्राधान्य द्यावे. विद्युत रोषणाईचा व ध्वनिक्षेपकाचा वापर कायदेशीर मर्यादित करणेते मानांकाप्रमाणे दिवसा व रात्री ध्वनीची पातळी नियंत्रीत ठेवण्यासाठी दक्षता घ्यावी. निर्माल्य व पूजा साहित्य नदीपात्रात अथवा तलावात न टाकता निर्माल्य कुंडातच टाकावे. विसर्जनाच्या ठिकाणी कचरा, उरलेले सजावटीचे व पूजेचे साहित्य तसेच इतर साहित्य जाळण्यास सक्त मनाई आहे.

### पाण्याचा स्त्रोत दुषित करणे दंडनीय अपराध...

सार्वजनिक ठिकाणी असलेला ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे साठवून त्याची स्थानिक आरोग्य विभागाच्या मदतीने योग्य ती विल्हेवाट लावावी. नदीतील पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी आपल्या परिसरामध्ये मंडळांनी शक्यतो मूर्तीदानाचे कार्यक्रम राबवावेत राज्य सरकार व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पाण्याचा स्त्रोत दूषित करणे हा दंडनिय अपराध आहे त्यामुळे नदीचे पाणी दूषित न होणेकामी सर्व नागरिकांनी व गणेश भक्तांनी सहकार्य करावे. कोविड १९ या विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

---

# महापालिकेचा आता 'पारदर्शी व्यवहार'

## ई.सी.एस. सुविधा सुरु : लेखा विभागाचे परिपत्रक जारी !

पिंपरी। ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



कंत्राटदार, वस्तू अथवा सेवा पुरवठादार यांची महापालिकेच्या वतीने देण्यात येणारी देयके यापुढे केवळ इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवा (ई.सी.एस. सुविधा) प्रणालीद्वारे दिली जाणार आहेत. तसे महापालिकेच्या सर्व विभागांना बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे स्वतंत्र परिपत्रक लेखा विभागाने निर्गमित केले आहे.

लेखा विभागाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र कोळंबे यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, महापालिकेच्या वतीने नागरिकांना द्यावयाच्या सोयीसुविधा सुलभ होण्यासाठी आधुनिक संगणकीय प्रणालीचा वापर करून त्यांचे सुसूत्रीकरण करण्यात येत आहे. प्रशासकीय गतिमानतेला चालना देण्यासाठी आणि आर्थिक व्यवहार पारदर्शक होण्यासाठी महापालिकेच्या वतीने ई.सी.एस. सुविधा प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे. याद्वारे उपभोक्त्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा केली जात आहे. मात्र काही विभागांकडून पाटबंधारे विभाग, महावितरण, एम.आय.डी.सी, पाणी बिले, बी.एस.एन.एल यांची देयके धनादेशाद्वारे अदायगी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कोणत्याही बिलांची अदायगी करण्यासाठी आता ई.सी.एस. प्रणालीचा वापर करणे सर्व विभागांना बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच यापुढे लेखा विभागाकडून कोणत्याही कंत्राटदार, वस्तू अथवा सेवा पुरवठादार यांची देयके धनादेशाद्वारे अदायगी करण्यात येणार नसल्याचेही या परिपत्रकात नमूद केले आहे.

महापालिकेच्या ज्या विभागांमार्फत देयके धनादेशाद्वारे अदायगी करण्यात येत आहेत, अशा सर्व विभागांनी कंत्राटदार, वस्तू व सेवा पुरवठादार यांची ई.सी.एस. नोंदणी करून घेण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखांकडून प्रमाणित करून लेखा विभागामार्फत नोंदणी करून घ्यावी. तसेच यापुढील सर्व देयकांची अदायगी ई.सी.एस. प्रणालीद्वारे करण्यात येणार असून ई.सी.एस प्रणालीद्वारे अदायगी झाल्यानंतर संबंधित विभागाने त्या कंत्राटदार, वस्तू अथवा सेवा पुरवठादार यांना अदायगी झाल्याबाबत खातरजमा करणे तसेच कंत्राटदार, वस्तू अथवा सेवा पुरवठादार यांना या संबंधी कोणतीही शंका अथवा अडचण असल्यास लेखा विभागाशी संपर्क साधावा, असे या परिपत्रकाद्वारे लेखा विभागामार्फत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे.

### कॅश व्यवहाराला आता प्रतिबंध...

यापूर्वी महापालिकेच्या लेखा विभागामार्फत अधिकारी, कर्मचारी तसेच विविध विभागांसाठी लागणाऱ्या वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी तसेच आर्थिक व्यवहार पारदर्शक व रोख विरहित करण्यासाठी "प्रीपेड पेट्रो कार्ड" सर्व विभागांना देण्यात आले आहे. त्याचा वापर सर्व विभागांमार्फत वाहनात इंधन भरण्यासाठी करण्यात येत आहे. यामुळे महापालिकेचे आर्थिक व्यवहार रोख विरहित करणे शक्य झाले आहे.

## संपादकीय »

# रुग्णालयांचा भेदभाव...

***रुग्णालयांचा खर्च न परवडल्याने दर वर्षी सहा कोटी नागरिक गरिबीच्या रेषेखाली ढकलले जातात, असा अंदाज केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' ही 'जगातील सर्वांत मोठी' मोफत आरोग्यसेवा योजना जाहीर करताना बांधला होता.***

रुग्णालयांचा खर्च न परवडल्याने दर वर्षी सहा कोटी नागरिक गरिबीच्या रेषेखाली ढकलले जातात, असा अंदाज केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' ही 'जगातील सर्वांत मोठी' मोफत आरोग्यसेवा योजना जाहीर करताना बांधला होता. 'एकसो तीस करोड' भारतीयांच्या मानाने हा सरकारी आकडा कमी वाटतो. याशिवाय, यात किती कुटुंबे कर्जबाजारी होतात व देशोधडीला किती लागतात, याचा काहीही उल्लेख नाही. अर्थात, अशी वेळ येऊ नये, यासाठीच ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केली होती. त्यात प्रत्येक गरीब कुटुंबाला दर वर्षी पाच लाख रुपयांपर्यंतची रुग्णालयसेवा मोफत मिळू शकते. ५० कोटी नागरिकांचा हा सरकारने हमी घेतलेला आरोग्यविमा आहे. असे असूनही सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी रुग्णालये कॉर्पोरेट होत चालली असून, ती गरिबांना चांगली आरोग्यसेवा देत नाहीत, असा स्पष्ट ठपका ठेवला आहे. याचा अर्थ, एक तर पंतप्रधानांची योजना सर्वदूर पोहोचलेली नाही किंवा शहरांमधील अनेक रुग्णालयांनी शस्त्रक्रियेच्या टेबलवरच नव्हे, तर बाहेरही रुग्णांना 'कापण्याचे शस्त्रकर्म' चालू ठेवलेले दिसते. अजूनही पुरता न संपलेला करोनाकाळ हा आरोग्यसेवेवर क्ष किरण टाकण्याची आणि तिची मूलभूत फेररचना करण्याची संधी होती. ती वाया गेलेली दिसते.

न्या. रमणा यांनी राजधानीत डॉक्टरांसमोरच भावना व निरीक्षणांना वाट करून दिली. ती सर्व भारतीयांची प्रातिनिधिक वेदना आहे. विषमतेवर बोट ठेवून ते म्हणाले, 'छाती दडपून टाकणाऱ्या संभाव्य खर्चामुळे अनेक जण व्याधी लपवूनच ठेवतात. हे कळते तेव्हा मन विदीर्ण होते. यावर काही तरी इलाज केला पाहिजे.' आरोग्यसेवा सोपी, परवडणारी आणि रुग्णस्नेही असावी, हेच प्रत्येकाला वाटते. आज 'भारतात या आणि युरोपपेक्षा उत्तम; तरीही स्वस्त उपचारसेवा मिळवा,' अशी जाहिरात जगभर केली जाते. 'वैद्यकीय पर्यटना'ची किती हजार कोटी रुपये कमावण्याची क्षमता आहे, याचे हिशेब मांडले जातात. ते खरे असतील; मात्र 'इंडिया'चे हे रूप जगापुढे ठेवताना 'भारता'तील लाखो रुग्ण पैशांअभावी उपचार घेऊ शकत नाहीत आणि घेतात तेव्हा कर्जबाजारी होतात, हे चित्रही विसरता कामा नये. त्यावर न्या. रमणा यांनी बोट ठेवलेच आहे. देशभरात त्रिस्तरीय आरोग्यसेवा योजना अपवाद वगळता फसली आहे. महाराष्ट्रातही खेडोपाडी प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था काय आहे, याचा एकदा जिल्हावार आढावा मुख्यमंत्र्यांनी घ्यावा.



## आनंदी सकाळ

# 'न्हाये धोये तो क्या हुआ, मन का मैला न जाय।

कबीरदास म्हणतात, 'न्हाये धोये तो क्या हुआ, मन का मैला न जाय। मीन सदा जल में रहे, धोये बांस न जाय।' मासा सदैव पाण्यात राहतो; पण कितीही साबणाने धुतले, तरी त्याचा वास जात नाही. अंघोळ केल्याने देहाची स्वच्छता वाढते, मनाची नाही. मनाची अंघोळ म्हणजे उपासना. उपासना तन्मयतेने केली, तर मनाचे तिन्ही दोष जातात. ज्याचे मल आणि विक्षेप दोष जातात, त्याच्या दारी गुरू येतात. गुरू तर कृपेसाठी तयारच असतात. सूर्य उगवल्यावर त्याची किरणे दरवाजातून येतातच; पण आपल्याला त्याची किरणे नको असतात. आपण दरवाजा बंद करून टाकतो. यात दोष सूर्याचा नाही. दार उघडले, तर सूर्याची किरणे स्वागत करायला तयारच आहेत, फक्त दार उघडण्याचा विलंब आहे. तसे मल आणि विक्षेप हे दोष निघून गेले, म्हणजे तुमचे दार उघडले. दार उघडले, की आवरण दोष काढण्यासाठी सद्गुरू आपल्यासमोर आहेतच.

# भारतीय कंपन्यांच्या उपकंपन्यांची गुंतागुंत ?




नदी-तलावाचा पृष्ठभाग व्यापून टाकणाऱ्या जलपर्णीची मुळे एकमेकांत गुंतलेली असतात त्याप्रमाणे भारतीय कंपन्यांच्या उपकंपन्यांची गुंतागुंत असते.

सांप्रत काळी व्यवस्थेच्या दोन परस्परविरोधी टोकांवर असलेले गौतम अदानी, त्यांचे उद्योगसाम्राज्य आणि प्रणव रॉय यांची एनडीटीव्ही कंपनी यांच्यातील संभाव्य संकर शक्यता अनेकांस धक्कादायक वाटणे साहजिक. यानिमित्ताने आर्थिक दांडगाईने एखादी कंपनी ताब्यात घेणे (होस्टाइल टेकओव्हर), कुडमुडय़ा भांडवलशाहीतील बाजारपेठीय नियमन इत्यादी मुद्दय़ांची



चर्चा यानिमित्ताने होईलच. ती करण्याआधी एनडीटीव्ही काँग्रेसधार्जिणा आणि म्हणून भाजपविरोधी कसा आहे किंवा अदानी समूहाची भरभराट विद्यमान सरकारच्या काळात कशी झाली वगैरे हेत्वारोपी मुद्दय़ांस स्पर्श करणे टाळायला हवे. आपल्याकडे कोणी कोणावरही टीका केली वा कोणी कोणाचे समर्थन केले की त्यातील मुद्दय़ांकडे संपूर्ण डोळेझाक करून संबंधितांच्या कृत्यांमागील उद्देश शोधला जातो. या असल्या हीन सवयीमुळे माध्यमांतील वा अन्यही टीकाटिप्पणी हेत्वारोपांच्या चष्म्यांतूनच पाहिली जाते. परिणामी निरोगी वादसंवादच आपल्या समाजात आताशा दुरापास्त होऊ लागले आहेत. या वास्तवाचे भान ठेवून एनडीटीव्ही आणि अदानी समूह यांच्यातील या व्यवहाराची चर्चा येथे होईल. दुसरे कारण म्हणजे आपल्याकडे एकूणच अर्थव्यवहारांबाबत असलेली उदासीनता आणि त्यामुळे त्याबाबत साचलेली निरक्षरता. परिणामस्वरूप कोणी तरी खिशात पुरेसे पैसे घेऊन बाजारात गेला आणि त्यास हवे ते विकत घेऊन परतला इतक्याच मर्यादित नजरेने अदानी समूह आणि एनडीटीव्ही यांच्यातील या व्यवहाराकडे पाहिले जाते.

सर्व काही घटनाबाह्य करायचं आहे का? विचारणाऱ्या आदित्य ठाकरेंना एकनाथ शिंदेंनी दिलं उत्तर, म्हणाले "काही लोक..."

वास्तव यापेक्षा पूर्ण वेगळे आहे. ते समजून घेण्याच्या प्रयत्नांतील पहिला प्रश्न म्हणजे अदानी समूहाकडे एनडीटीव्हीचे सुमारे २९ टक्के समभाग आलेच कसे? ते ना बाजारातून विकले गेले. म्हणजे त्यांची तेथे उघड खरेदी झालेली नाही. ना एनडीटीव्हीच्या कोणा भागधारकाने आपल्याकडील मालकी अदानी समूहास विकली. तरीही या वाहिनीच्या मालकीतील २९ टक्के इतका मोठा समभाग अदानींकडे गेलाच कसा? त्याचे उत्तर दशकभरापूर्वी एनडीटीव्ही कंपनीचे प्रवर्तक प्रणव आणि राधिका रॉय यांनी घेतलेल्या सुमारे ४०० कोटी रुपयांच्या कर्जात आहे. त्या वेळी अपरिचित अशा 'विश्वप्रधान कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने रॉय दम्पतीच्या कंपनीस हे कर्ज दिले.

# केवळ भावनिक राजकारणाचा भाग

**"राज्याच्या हितासाठी सैनिक जेवढा महत्त्वाचा आहे, तेवढेच शेतकरी. या दोघांच्याही अडचणी सोडवताना दुजाभाव करायचा नाही असे महाराजांचे धोरण होते.**

तेव्हा दुष्काळ खूप पडायचा. त्यामुळे उपासमारीची पाळी येऊन शेतकऱ्यांवर मरण ओढवू नये यासाठी धान्याची कोठारे भरलेली असावीत याकडे महाराजांचा कटाक्ष असे. अचूक आणेवारीची पद्धत अमलात आणणारे महाराज देशातले पहिले राजे होते. शेतीचे नुकसान झाले तर संबंधित शेतकऱ्याला त्वरित भरपाई मिळायलाच हवी असे त्यांचे सक्त आदेश होते. राजवटीतील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्रास दिलेला त्यांना अजिबात खपायचे नाही. शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळायलाच हवी याकडे ते सतत लक्ष देऊन असायचे. शेतसारा गोळा करणारे वतनदार शेतकऱ्यांची पिळवणूक करतात हे लक्षात आल्यावर त्यांनी वतनदारी पद्धतीत अनेक बदल केले. 'शेतकरी सुखी तर राज्य सुखी' अशी त्यांची धारणा होती" ही वैशिष्ट्ये आहेत शिवाजी महाराजांच्या राजवटीची.

ती आठवण्याचे कारण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताज्या कृतीत दडलेले. राज्याचा कारभार



हाकताना ऊठसूट महाराजांचे नाव घेण्याची परंपराच अलीकडे रूढ झालेली. त्यालाच पुढे नेत शिंदेंनी राज्यातील तमाम शेतकऱ्यांना लिहिलेले भावनिक पत्र नुकतेच विधिमंडळात वाचून दाखवले. अतिवृष्टी, नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला भाव आदी मुद्द्यांवरून गेली काही दशके अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये अशी साद या पत्रात घातलेली. 'महाराजांची शपथ, आत्महत्या करू नका' हे त्यातले एक महत्त्वाचे वाक्य. शिंदेंनी थेट शेतकऱ्यांना संबोधण्यात काही गैर नाही. तो त्यांचा अधिकार आहेच. मात्र शेतकऱ्यांना असे भावनिक आवाहन करताना शिंदे ज्या सरकारचे प्रमुख आहेत ते शेतकऱ्यांच्या संदर्भात नेमके काय करते? सरकारच्या पातळीवर होत असलेल्या शेतकऱ्यांच्या कोंडीचे काय? सरकारची धोरणे खरोखर शेतकरीहिताची आहेत काय? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

शिंदे ज्या शिवाजी महाराजांचे नाव घेतात त्यांची राजवट सोळाव्या शतकातली. त्यालाही आता ५०० वर्षे होत आलेली. या काळात प्रगती झाली हा सरकारचाच दावा मान्य केला तर ती समाजातील सर्व घटकांसोबत शेतकऱ्यांचीही व्हायला हवी होती, ती का झाली नाही? शेतकरी दिवसेंदिवस संकटात का सापडत गेला यावर आत्मपरीक्षण करण्याऐवजी शिंदे शपथा कशाच्या देत आहेत? महाराजांची शपथ घेतली म्हणजे शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी दूर होतील व तो आत्महत्येपासून परावृत्त होईल असे शिंदेंना वाटते काय? वास्तवात हे शक्य नाही हे ठाऊक असूनही ते महाराजांचे नाव घेत असतील तर हे फुकाचे राजकारण ते कशासाठी करीत आहेत? हे सरकार सत्तेत आल्यापासून राज्यात ११४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यंदा अतिवृष्टी व त्यातून उद्भवणाऱ्या या नापिकीमुळे हा आकडा वाढण्याची भीती सारेच व्यक्त करतात.

## ।। अभंगवाणी ।।




पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर ट्रॅफिक ब्लॉक



। मुंबई ।। महाईन्यूज ।

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील किवळे गावाजवळ ( मुंबई दिशेने ओव्हर हेड गॅन्ट्री उभारण्याचे काम शुक्रवारी करण्यात येणार आहे. या कामासाठी दुपारी १२ ते २ या वेळेत पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक किवळे ते सोमाटणे फाटादरम्यान बंद राहील, अशी माहिती एमएसआरडीसीकडून देण्यात आली आहे. किवळे ते सोमटणे फाटादरम्यान दोन तास वाहतूक बंद राहणार असल्याने वाहतूक किवळे ते देहू रोड मार्ग, राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून तसेच सोमाटणे फाटा ते द्रुतगती मार्गावरील तळेगाव पथकर नाका मार्गे वळवण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी ट्राफिक ब्लॉक दरम्यान द्रुतगती पर्यायी मार्गाचा वापर करावा.

# पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये 69 मोटार ड्रायव्हिंग स्कूल अवैध!

### पावसाळी अधिवेशन : आमदार लक्ष्मण जगताप यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले

।मुंबई ।महाईन्यूज।

पिंपरी-चिंचवड आणि पुणे या दोन्ही शहरांमध्ये वाहन चालवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या अनेक मोटार ड्रायव्हिंग स्कूल अनधिकृतपणे सुरू असल्याच्या मुद्द्याकडे आमदार लक्ष्मण जगताप यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करून विधानसभेचे लक्ष वेधले आहे. दोन्ही शहरात किती मोटार ड्रायव्हिंग स्कूल मुदत संपल्यानंतरही सुरू आहेत?, अशा संस्थांवर शासनाने काय कार्यवाही केली?, असे प्रश्न आमदार जगताप यांनी अधिवेशनात उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तर दिले असून, पिंपरी-चिंचवड आणि पुणे या दोन्ही शहरात ६९ मोटार ड्रायव्हिंग स्कूल मुदत संपल्यानंतरही

पावसाळी अधिवेशन 2022



नूतनीकरण न करता सुरू आहेत. तसेच २१६ मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे परवाने रद्द करण्याची कारवाई सुरू असल्याचे उत्तरात म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवड आणि पुणे या दोन्ही शहरात अनेक मोटार ड्रायव्हिंग स्कूल आहेत. परंतु, यातील अनेक मोटार ड्रायव्हिंग स्कूल अनधिकृतपणे सुरू आहेत. आरटीओकडून घेतलेल्या परवान्याचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही. तसेच आरटीओने देखील या मोटार ड्रायव्हिंग स्कूलची तपासणी केलेली नाही. याप्रकरणी आमदार लक्ष्मण



> *प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत (आरटीओ) नवीन मोटार ड्रायव्हिंग स्कूल मंजूर करताना अथवा मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या नूतनीकरणास मंजुरी देताना संबंधित कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून मोटार स्कूलची प्रत्यक्ष पाहणी करून मोटार वाहन कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन परवाना मंजुरी अथवा त्याचे नूतनीकरण केले जाते. प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सर्व मोटार ड्रायव्हिंग स्कूलची तपासणी करण्यासाठी विशेष मोहिम राबवण्यात येते.*
>
> **- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री.**

जगताप यांनी सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले. आमदार जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तर दिले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे, “पुणे कार्यालयाच्या अभिलेखावर मंजूर मोटार ड्रायव्हिंग स्कूलची एकूण संख्या ५०३ आहे. यांपैकी २८७ मोटार ड्रायव्हिंग स्कूलना सारथी ४.० प्रणालीवर लॉगीन आयडी देण्यात आले आहेत. परंतु, २८७ पैकी २१८ मोटार ड्रायव्हिंग स्कूलचा परवाना वैध आहे.

उर्वरित ६९ मोटार ड्रायव्हिंग स्कूलची मुदत संपलेली आहे. त्यांनी अद्याप नूतनीकरण केलेले नाही. नूतनीकरणासाठी या सर्व मोटार ड्रायव्हिंग स्कूलना नोटीस जारी करण्यात आली आहे. त्यांचे लॉगीन बंद आहेत. उर्वरित २१६ मोटार ड्रायव्हिंग स्कूल बऱ्याच कालावधीपासून बंद असून, त्यांना सारथी प्रणालीवर लॉगीन दिलेले नाहीत. त्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई सुरू आहे.

### टाटा मोटर्सच्या कामगारांमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून तीव्र असंतोष

# टाटा मोटर्सच्या दोन हजार कामगारांचा जेवणावर बहिष्कार

### यासंदर्भात तोडगा काढण्यासाठी कंपनीत चर्चा, बैठकांचे सत्र सुरू

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज।

टाटा मोटर्स कंपनीच्या कार विभागातील (कार प्लांट) कामगारांमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून तीव्र असंतोष आहे. वेतनवाढ करारातील तरतुदी आणि जेवण व नाष्ट्याच्या वेळेतील बदल, यासह इतर कारणास्तव कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या चहा, नाश्ता आणि जेवणावर दोन हजारांहून अधिक कामगारांनी बहिष्कार घातला आहे. यासंदर्भात तोडगा काढण्यासाठी कंपनीत चर्चा, बैठकांचे सत्र सुरू आहे. मात्र, त्या निष्फळ ठरल्या आहेत.




बहिष्कार मागे घेण्याचे व्यवस्थापनाकडून आवाहन –

कंपनीचे कामकाज विस्कळीत होण्याबरोबर कामावर परिणामही जाणवण्याची चिन्हे दिसू लागली असल्याने कामगारांनी बहिष्कार मागे घ्यावा व कामावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन व्यवस्थापनाकडून वारंवार केले जात आहे. तथापि, अपेक्षित तोडगा निघत नसल्याने कामगार मागे हटण्यास तयार नाहीत. त्यामुळे तूर्त तिढा कायम आहे.

#### जवळपास सहा ते सात तास या बैठका मात्र तोडगा नाही

कामगारांचा अंतर्गत विषय म्हणून व्यवस्थापनाने या वादापासून स्वत:ला दूर ठेवले होते. तथापि, वाद वाढतच असल्याचे पाहून व्यवस्थापनाने लक्ष घातले.

गेल्या शुक्रवारपासून व्यवस्थापनातील अधिकारी व कामगार प्रतिनिधी यांच्यात सतत बैठका होत आहेत. जवळपास सहा ते सात तास या बैठका होतात. मात्र, त्या चर्चेतून काहीही निष्पन्न होताना दिसत नाही.

#### नाराजीची तीव्रता खूपच जास्त

**टाटा मोटर्सच्या कामगारांचा व्यवस्थापनाशी ३ मे २०२२ रोजी वेतनवाढ करार झाला. दर तीन वर्षांनी करार होण्याची ४० वर्षांची परंपरा यंदा खंडीत झाली. यंदापासून तो दर चार वर्षांनंतर होणार आहे. हा बदल कामगारांना मान्य नव्हता. आमचा विरोध असतानाही संघटनेने तो मान्य केल्याची कामगारांची तक्रार आहे. कंपनीतील इतर विभागांचा वेतनवाढ करार झाला. त्याचपध्दतीने कार विभागाचा करार न झाल्याने असंतोष असतानाच, कामगारांच्या नाश्ता, चहासाठीची पूर्वीची वेळ बदलण्यात आली. त्यावरून नाराजीत भरच पडली.**

**परिणामी, कामगारांनी सुरूवातीला चहा, नाष्टा व नंतर जेवणावर बहिष्कार घातला. प्रारंभी नाराज कामगारांची संख्या मर्यादित होती. पुढे ती वाढत गेली. सध्या दोन हजारांच्या पुढे कामगारांनी बहिष्कार घातला आहे. त्यामुळे संघटना प्रतिनिधींकडून कामगारांची समजूत काढण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र, नाराजीची तीव्रता खूपच जास्त असल्याने कामगारांकडून प्रतिसाद मिळत नाही.**

# उद्धव ठाकरेंच्या ‘कंत्राटी मुख्यमंत्री’ टीकेला एकनाथ शिंदेंचं प्रत्युत्तर!

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना खोचक टोला!



**दिल्ली महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्य विधिमंडळ अधिवेशनामध्ये सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांसोबतच बाहेरून काही राजकीय नेतेमंडळीदेखील अधिवेशनातील मुद्द्यांवरून टीका करताना दिसत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईत केलेल्या एका टीकेवरून सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असून त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत बोलताना त्यावर प्रत्युत्तर दिलं आहे. तसेच, ‘आपण कंत्राटी मुख्यमंत्रीच आहोत’ असं देखील एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. त्यामुळे आता या मुद्द्यावरून दोन्ही बाजूंनी राजकीय कलगीतुरा रंगण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर टीका करताना त्यांचा उल्लेख कंत्राटी मुख्यमंत्री असा केला होता. तसेच, दुसऱ्या पक्षातून आमदार-खासदार चोरणं हाच यांचा एककलमी कार्यक्रम झालाय, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी भाजपावर टीका केली. “यांचा एककलमी कार्यक्रम आहे की दुसऱ्या पक्षातून नेते आणा..आमदार-खासदार आणा. तेही पुरत नाहीत म्हणून दुसऱ्या पक्षातून पक्षप्रमुख चोरा. स्वत:ला स्वप्नंही पडत नाहीत. त्यामुळे दुसऱ्यांची स्वप्नंही चोरा”, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. दरम्यान, यावर बोलताना एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. “आज माझा उल्लेख झाला कंत्राटी मुख्यमंत्री म्हणून.. राज्याचा कुणीही मुख्यमंत्री असू द्या.. जेव्हा राणेंनी कुठेतरी भाषणात मुख्यमंत्र्यांबद्दल काहीतरी उल्लेख केला होता. त्यांना तुम्ही जेलमध्ये टाकलं. केंद्रीय मंत्री असलेला माणूस. जेवायला बसला होता. त्याला जेवूही दिलं नाही. का, तर मुख्यमंत्र्यांविरुद्ध अपशब्द वापरले. आता कंत्राटी मुख्यमंत्री म्हणाले आहेत. या देशाच्या लोकशाहीत घटनेप्रमाणे आम्ही इथे बहुमत सिद्ध करून बसलो आहोत. उगाच बसलो नाहीत. नाहीतर न्यायालयाने आम्हाला काढून टाकलं असतं”, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

### “हो, मी कंत्राटी मुख्यमंत्री आहे”

“वैचारिक पातळी एकदम खालावली आहे. घसरली आहे. हो मी कंत्राटी मुख्यमंत्री आहे. महाराष्ट्राच्या विकासाचं कंत्राट मी घेतलं आहे. हे राज्य अधिक समृद्ध करण्याचं कंत्राट मी घेतलं आहे. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचं कंत्राट मी घेतलं आहे. लोकांचं दु:ख दूर करण्याचं कंत्राट मी घेतलंय. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचा विचार पुढे नेण्याचं कंत्राट मी घेतलं आहे. बहुजनांच्या सर्वांगीण विकासाचंही मी कंत्राट घेतलं आहे. असंगाशी संग करण्यापेक्षा कंत्राटी मुख्यमंत्री केव्हाही बरा”, असा टोलाही एकनाथ शिंदेंनी यावेळी लगावला. विरोधी पक्षाने मुद्दे मांडायला हवेत. राज्याच्या हिताचे मुद्दे मांडले पाहिजेत. आता विरोधकांकडे मुद्देच नाहीत. त्यामुळे वैचारिक दिवाळखोरीतून केवळ हिणवणे असंच सुरू आहे. पण आम्ही त्यावर कामाने उत्तर देणार. प्रत्येकाने आपली मर्यादा सांभाळली पाहिजे”, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी चारोळीच्या माध्यमातून विरोधकांना खोचक टोला लगावला.

### एकनाथ शिंदे म्हणाले...

जीवन उसी का मस्त है, जो समाज की उन्नती में व्यस्त है
परेशान वही, जो दुसरों की उन्नती में त्रस्त है!

# “मोदी सरकारने तपासात सहकार्य केलं नाही”!



**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देशातील काही राजकीय नेते, विरोधक, पत्रकार यांच्यासह अनेक बड्या लोकांच्या फोनमध्ये ‘पेगासस’ व्हायरस इन्स्टॉल केल्याचा आरोप सरकारवर करण्यात येत होता. याबाबतचा एक अहवाल आज सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश एन व्ही रमणा यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सादर करण्यात आला आहे. पेगाससबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने आपल्या अहवालात धक्कादायक खुलासा केला आहे. पेगागस व्हायरस असल्याच्या संशयातून २९ फोन तपासले असता त्यातील पाच फोनमध्ये मालवेअर सापडल्याचं अहवालात म्हटलं आहे. परंतु पेगासस स्पायवेअरचा कोणताही निर्णायक पुरावा आढळला नाही. याप्रकरणी चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य केलं नाही, असंही या समितीनं न्यायालयात सांगितलं आहे.राजकारणी, कार्यकर्ते आणि पत्रकारांच्या फोनमधील माहिती चोरण्यासाठी पेगासस स्पायवेअरचा कथित वापर करण्याबाबत, छाननी करण्यासाठी तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आज सर्वोच्च न्यायालय आपला अहवाल सादर केला आहे. पेगासस प्रकरणी चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य केलं नाही, असं या अहवालात म्हटलं आहे.सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, हा अहवाल तीन भागांमध्ये सादर केला आहे. तांत्रिक समितीचे दोन अहवाल आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर व्ही रवींद्रन यांच्या नेतृत्वाखालील समितीचा एक अहवाल, असे एकूण तीन अहवाल न्यायालयात सादर करण्यात आले आहेत. न्यायमूर्ती रवींद्रन यांच्या अहवालाचा तिसरा भाग सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर सार्वजनिक केला जाईल.

# झारखंड सरकार संकटात? मुख्यमंत्र्यांची आमदारकी रद्द करण्यासंबंधी निवडणूक आयोगाचं राज्यपालांना पत्र

**।पाटणा। ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**



भारतीय निवडणूक आयोगाने (ECI) झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना आमदार म्हणून अपात्र ठरवण्याची शिफारस केली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. निवडणूक आयोगाने झारखंडचे राज्यपाल रमेश बैस यांना यासंदर्भात पत्र लिहिले आहे. राज्यपाल रमेश बैस अवैध खाण वाटप प्रकरणात निवडणूक आयोगाकडे मत मागितले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने ही शिफारस केली आहे. दरम्यान, झारखंडचे राज्यपाल सध्या दिल्लीत असून ते आज झारखंडमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ९ (अ) चा दाखला देत, हेमंत सोरेन यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याचा ठपका ठेवला आहे. १८ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाने हेमंत सोरेन आणि त्यांचे भाऊ बसंत सोरेन या दोघांचेही म्हणणे ऐकून घेतले होते. त्यानंतरच निवडणूक आयोगाने अपात्रतेची शिफारस केली आहे. मात्र, अंतिम निर्णय राज्यपालांकडून घेतला जाणार आहे.

हेमंत सोरेन यांनी स्वत:लाच खाण वाटप करत भ्रष्टाचार केल्याचा आरोप भाजपने केला होता. तसेच माहिती अधिकार कार्यकर्ते शिवशंकर शर्मा यांनी या घोटाळ्याची सीबीआय आणि ईडीकडे चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या दोन जनहित याचिका दाखल केल्या होत्या. हेमंत सोरेन यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून ही खाण स्वत:च्या नावावर करून घेतल्याचा आरोप या

# 20 कोटींची ऑफर दिल्याचा आपचा भाजपवर आरोप

## दिल्लीतील राजकीय घडामोडींना वेग

**दिल्ली महाईन्यूज ।**

सध्या देशातलया राजकारणात जेवण घडामोडी घडत आहेत. देशासोबत काही राज्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर राजकीय घडामोडी घडत आहेत. अशातच दिल्लीतील राजकीय घडामोडींना सुद्धा मोठा वेग आलाय. देशाची राजधानी दिल्ली मध्ये सुद्धा राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. आम आदमी पार्टी(aap) आणि भाजप(bjp) या दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये आरोप – प्रत्यारोपांच्या फेऱ्या सुरूच आहेत. अशातच भाजप कडून आपच्या आमदारांना विकत घेण्याचा प्रयत्न केला गेला भाजप कडून प्रत्येकी 20 कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप आपच्या नेत्यांनी



भाजपवर केला आहे. तर दुसरीकडे भाजपच्या हातात आलेल्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून भाजप कडून धमक्या सुद्धा दिल्या जात आहेत असा सुद्धा आरोप आप कडून भाजपवर करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल (arvind kejriwal) यांनी आपच्या सर्व आमदारांची आज बैठक बोलावली आहे. आपची पुढची रणनीती काय असणार त्याची चर्चा सुद्धा या बैठकीत होणार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल(arvind kejriwal) यांच्या अध्यक्षतेखाली कालही राजकीय गैरव्यवहार समितीची बैठक पार पडली होती. ईडी(ED) आणि सीबीआय(CBI) म्हणजेच केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर आणि कोट्यवधींची ऑफर दिल्या प्रकरणी भाजपच्या विरुद्ध ठराव सुद्धा मंजूर करण्यात आला. त्याचबरोबर भाजप(bjp) पक्ष फोडण्याचे षडयंत्र रचत आहे असा आरोप सुद्धा आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी केला. याच सगळ्या निवडक आणि महत्वाच्या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आज सकाळी 11 वाजता आपच्या सर्व आमदारांची बैठक घेणार आहेत.

# प्रेम म्हणजे काय असतं' या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला

प्रत्येकाच्याच मनात प्रेमाची भावना वेग वेगळी असते. प्रेम, आपुलकी आणि उत्कटता या गोष्टी माणसाला कल्पनाशील बनवतात. प्रेम प्रत्येक माणसाच्या मनात असते. हीच प्रेमाची संकल्पना अतिशय वेगळ्या पद्धतीने "प्रेम म्हणजे काय असतं"या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. या चित्रपटाचं मोशन पोस्टर नुकतंच सोशल मीडियाद्वारे लाँच करण्यात आले असून येत्या 4 नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. तख्त प्रॉडक्शन यांनी "प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. प्रसाद दत्तात्रय इंगवले यांनी चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती अशी तिहेरी जबाबदारी निभावली आहे.कलाकारांची नावे गुलदस्त्यात असून ती लवकरच आता जाहीर होतील. प्रेम ही संकल्पना अत्यंत वेगळ्या पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आली आहे. प्रेम या संकल्पनेवर आजवर अनेक चित्रपट झाले. मात्र याच संकल्पनेचा आणखी एक वेगळा पैलू "प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटातून मांडला जाणार आहे.

"प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटातून एक हृदयस्पर्शी प्रेमकथा प्रेक्षकांना प्रेक्षकांना पाहता येणार आहे. प्रेम या संकल्पनेवर आधारित अनेक चित्रपट यापूर्वीही प्रदर्शित झाले आहेत. या सर्वच चित्रपटांना प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. "प्रेम म्हणजे काय असतं"य याचित्रपटातून नेमकी गोष्ट पाहायला यासाठी प्रेक्षक सुद्धा उत्सुक आहेत.






# मिया, बिवी और वो...!

अभिनेता शाहिद कपूर आणि कियारा अडवाणी करण जोहरच्या लोकप्रिय चॅट शो 'कॉफी विथ करण'च्या सातव्या सीझनच्या आठव्या भागात दिसणार आहेत. या एपिसोडचा प्रोमो नुकताच रिलीज करण्यात आला आहे. प्रोमो खूपच मजेदार असून करण शाहिद आणि कियाराशी अनेक विषयांवर गप्पा मारताना दिसत आहे. करणने दोघांना वैयक्तिक आयुष्याबद्दल प्रश्न विचारले. तसेच त्यांच्या चित्रपट आणि आगामी प्रोजेक्टबद्दलही विचारलं. शाहिद आणि कियाराने करणच्या प्रश्नांची दिलखुलासपणे उत्तरं दिली.

या शोमध्ये शाहिदने त्याच्या आणि मीराच्या भांडणाचं कारण सांगितलं. त्या दोघांमध्ये रात्रभर कोणत्या कारणावरून भांडत होतं याबद्दल शाहिदने खुलासा केला. शोच्या रॅपिड-फायर राउंड दरम्यान शाहिद म्हणाला, "मी आणि मीरा दररोज रात्री पंख्याच्या स्पीडवरून भांडतो. आमच्यात असे शुल्लक मतभेद असूनही मीरा माझ्या जीवनाचा एक भाग आहे, याचा मला आनंद आहे. मीरा ही माझ्या आयुष्यात घडलेली सगळ्यात सुंदर गोष्ट आहे. ती माझ्या आयुष्यात खूप काही घेऊन आली आहे. ती मला पूर्ण करते. आम्हाला दोन सुंदर मुलं आहेत आणि आयुष्य छान वाटतंय," असंही शाहिद म्हणाला.

# अवतार : द वे ऑफ वॉटर' 'या' दिवशी होणार प्रदर्शित

2009 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अवतार' चित्रपटाचा आता येत्या काळात दुसरा सिक्वेल येणार आहे. 2009 साली या चित्रपटाने जगभरातील प्रेक्षकांच्या मनाला चांगली भुरळ पाडली होती. एका सामान्य कथेच्या आधारावर फक्त व्हिज्युअल इफेक्ट्सचा आधार घेऊन 'अवतार' चित्रपटाने जगभरात चांगलाच धुमाकूळ घातला होता. त्यावेळी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर करोडोंची कमाई केली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शक जेम्स कॅमेरून यांनी या चित्रपटाचा दुसरा सिक्वेल बनवण्याची घोषणा याआधीच केली होती. त्यामुळेच प्रेक्षक अनेक वर्षांपासून या चित्रपटाच्या दुसऱ्या सिक्वेलची आतुरतेने वाट पाहत होते.



या दुसऱ्या सिक्वेलच नाव 'अवतार 2' नसून 'अवतार : द वे ऑफ वॉटर' हे असणार आहे. ज्या प्रेक्षकांनी अवतार चित्रपट पाहिला आहे. त्यांना या चित्रपटातचा दुसरा भाग नक्कीच लक्षात येईल. अवतार हा हॉलिवूडमधील सर्वात मोठा चित्रपट आहे.

# अभिनेत्री अनन्या पांडेला करायचं आहे लोकप्रिय दिग्दर्शकाबरोबर काम

अभिनेत्री अनन्या पांडे ही सध्या सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आहे. तिचा आणि दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा यांचा 'लाइगर' हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी हे दोघे सध्या चांगलीच मेहनत घेत आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी हे दोघे मुलाखती देत आहेत. त्यांचं नवीन फोटोशूटसुद्धा चांगलंच व्हायरल झालं आहे. दिग्दर्शक निर्माता करण जोहरच्या बॅनरखाली हा चित्रपट तयार झाला आहे. नुकतंच ANI ला मुलाखत देताना अनन्याने ती चित्रपटासाठी आणि प्रेक्षकांच्या प्रतिसादासाठी प्रचंड उत्सुक असल्याचं स्पष्ट केलं आहे. सध्या बॉयकॉट ट्रेंडमुळे या चित्रपटाबद्दलसुद्धा प्रेक्षक टीका करत आहेत. पण अनन्या आणि विजय हे त्यांच्यापरीने भरपूर मेहनत घेत आहेत. याच मुलाखतीत अनन्याला कोणत्या दिग्दर्शकाबरोबर काम करायला आवडेल हा प्रश्न विचारण्यात आला होता.



# जॅकलिन पोहोचली देवदर्शनाला

जॅकलिन फर्नांडिसचं नाव लाँड्रिंग प्रकरणात चांगलेच चर्चेत आहे. ठग सुकेश चंद्रशेखर याच्याशी तिचे नाव जोडलं गेल्याने जॅकलिन फर्नांडिस आयकर विभागाच्या रडारवर होती. बुधवारी तिच्यावर ईडीकडून आरोपपत्र दाखल करण्यात आलं असून याप्रकरणी तिला आरोपी ठरवण्यात आलंय. आयकर विभागानं दिलेल्या माहितीनुसार, जॅकलिन फर्नांडिसला ठग सुकेश चंद्रशेखरनं ५.७१ कोटी रुपयांच्या महागड्या भेटवस्तू दिल्या होत्या. एवढंच नाही तर त्यानं तिच्या कुटुंबीयांनाही महागड्या भेटवस्तू दिल्या होत्या.

जॅकलिन फर्नांडिस सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे, अशावेळी तिने देवाचा धावा केला आहे. पिंकव्हीलाला मिळालेल्या माहितीनुसार, जॅकलिनने अलिकडेच दिल्लीतील छत्तरपूर येथील गुरुजींच्या आश्रमाची भेट घेतली. तिच्या जवळच्या व्यक्तिने असे सांगितले की, जॅकलिनने जुलैमध्ये आश्रमाला भेट दिली. गुरुजींनी स्थापन केलेल्या शिवमंदिरात जाऊन तिने आशीर्वाद घेतला. छत्तरपूर येथील गुरुजींच्या आश्रमात जाण्याचा सल्ला जॅकलीनच्या जवळच्या व्यक्तीने तिला दिला आहे. आश्रमात जाऊन आल्यापासून गुरुजींनी दिलेले ब्रेसलेट परिधान करत आहे आणि दिवसातून एकदा गुरु मंत्राचा जप करत आहे.बॉलिवूडमधील अनेक कुटुंबे दिल्लीतील गुरुजी निर्मल सिंग यांच्यावर दृढ विश्वास ठेवतात. जॅकलिनवरची कारवाई सुरु राहणार मात्र ती 'वूमन स्टोरीज' या चित्रपटाद्वारे हॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. तिचा विनोदी चित्रपट 'सर्कस' देखील या वर्षाच्या शेवटी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. जॅकलिन मूळची श्रीलंकेची आहे. अभिनेत्री होण्याआधी तिने मॉडेलिंगमध्ये देखील करियर केले आहे. 'अलाउद्दीन' या चित्रपटातून तिने पदार्पण केले. अभिनेता रितेश देशमुखसोबत तिने या चित्रपटात काम केले होते.



## शॉर्ट न्यूज »

### आशिया कप 2022 साठी हाँगकाँग पात्र, 31 ऑगस्टला भारताशी सामना;

**नवी दिल्ली । महाईन्यूज**

आशिया कप 2022 आशिया कपसाठी पात्रता फेरी पूर्ण झाली आहे. 27 ऑगस्टपासून यूएईमध्ये मुख्य फेरीचे सामने सुरू होणार आहेत. आशिया चषकासाठी पात्र ठरणारा हाँगकाँग हा सहावा संघ ठरला आहे. भारत आणि पाकिस्तानसह हाँगकाँगला अ गटात स्थान मिळाले आहे. 31 ऑगस्ट रोजी हाँगकाँगची भारताशी लढत होणार आहे. बुधवारी झालेल्या सामन्यात हाँगकाँगने आशिया चषक स्पर्धेचे यजमानपद भूषवणाऱ्या यूएईचा 8 गडी राखून पराभव केला. हाँगकाँग पात्र झाल्याने 27 ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया कप स्पर्धेतील दोन्ही गटांचे चित्र स्पष्ट झाले आहे. भारत, पाकिस्तान आणि हाँगकाँग अ गटात आहेत. दुसरीकडे अफगाणिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश ब गटात आहेत. आयसीसी क्रमवारीत हाँगकाँग सध्या 23 व्या क्रमांकावर आहे. असे असतानाही हाँगकाँगने सलग तीन सामने जिंकून आशिया चषकासाठी पात्रता मिळवण्यात

# पाकिस्तानविरुद्ध मैदानात उतरताच विराट कोहली रचणार इतिहास!

## विराट कोहलीचा हा T20 क्रिकेटमधला 100 वा सामना खेळणार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली बऱ्याच दिवसांपासून खराब फॉर्मशी झुंजत आहे. नोव्हेंबर 2019 मध्ये त्याने शेवटचे शतक झळकावले. तेव्हापासून त्याच्या फॉर्ममध्ये सातत्याने घसरण होत आहे. गेल्या महिन्यात इंग्लंड दौऱ्यात कोहलीला तिन्ही फॉरमॅटमध्ये अर्धशतकही झळकावता आले नाही. यानंतर त्याला वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे दौऱ्यावर विश्रांती



देण्यात आली होती. आशिया कपमध्ये 28 ऑगस्टला टीम इंडिया आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. या सामन्यापूर्वी विराट कोहलीचा फॉर्म चर्चेचा विषय राहिला आहे. मात्र विराट कोहली या सामन्यात मैदानात उतरताच एक विशेष स्थान मिळवणार आहे. विराट कोहलीचा हा T20 क्रिकेटमधला 100 वा सामना खेळणार आहे. विराट कोहली यासोबतच असा पराक्रम करणार आहे जो आतापर्यंत कोणताही भारतीय क्रिकेटपटूने केला नाही. विराट कोहली या सामन्यासह प्रत्येक फॉरमॅटमध्ये 100 हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा पहिला भारतीय खेळाडू असेल. विराट कोहलीने आतापर्यंत 99 टी-20 सामन्यांव्यतिरिक्त 102 कसोटी आणि 262 एकदिवसीय सामने खेळले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 23 हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. एवढेच नाही तर विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 70 शतके ठोकली आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके ठोकण्याच्या बाबतीत विराट कोहली फक्त सचिन तेंडुलकर आणि रिकी पाँटिंगच्या मागे आहे.

आशिया कपमध्ये 28 ऑगस्टला टीम इंडिया आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. या सामन्यापूर्वी विराट कोहलीचा फॉर्म चर्चेचा विषय राहिला आहे. मात्र विराट कोहली या सामन्यात मैदानात उतरताच एक विशेष स्थान मिळवणार आहे. विराट कोहलीचा हा T20 क्रिकेटमधला 100 वा सामना खेळणार आहे. विराट कोहली यासोबतच असा पराक्रम करणार आहे जो आतापर्यंत कोणताही भारतीय क्रिकेटपटूने केला नाही. विराट कोहली या सामन्यासह प्रत्येक फॉरमॅटमध्ये 100 हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा पहिला भारतीय खेळाडू असेल. विराट कोहलीने आतापर्यंत 99 टी-20 सामन्यांव्यतिरिक्त 102 कसोटी आणि 262 एकदिवसीय सामने खेळले आहेत.

# सायना नेहवाल बाहेर; कपिला-अर्जुन, सात्विक-चिराग जोडी उपांत्यपूर्व फेरीत



**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती सायना नेहवाल महिला एकेरीच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये कडवे आव्हान पेलल्यानंतर बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिपमधून बाहेर पडली आहे. सायना नेहवालला थायलंडच्या प्रतिस्पर्ध्याकडून 17-21, 21-16 आणि 13-21 असा पराभव पत्करावा लागला. या विजयासह बुसाननचा सायनाविरुद्धचा विजयी विक्रम 5-3 वर गेला आहे. भारतीय पुरुष दुहेरीच्या जोडीला उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात यश आले. ध्रुव कपिला व अर्जुन आणि सात्विकसाईराज रँकीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीने पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. बुसाननने सुरुवातीच्या गेममध्ये 11-3 अशी आघाडी घेत सायनाला दडपणाखाली ठेवले. तिसऱ्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंनी एकमेकांना कडवी टक्कर दिली. पण बुसाननने वेग पकडला आणि पाच गुणांची आघाडी घेतली. दुसरीकडे, सायना मागे राहिली आणि 26 वर्षीय बुसाननने सात मॅच पॉइंटसह आपले उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. अर्जुन आणि कपिला या बिगरमानांकित जोडीने 58 मिनिटांच्या रोमहर्षक लढतीत सिंगापूरच्या टेरी ही आणि लोह कीन हीन यांचा 18-21, 21-15, 21-16 पराभव केला. सात्विक आणि चिराग या जोडीने डेन्मार्कच्या जेप्पा बे आणि लासे मोल्हेडे यांचा 35 मिनिटांत 21-12, 21-10 असा पराभव केला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही